# जाहीर प्रगटन

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना व त्यांच्या अंतर्गत येणारी न्यायालये जिल्हा न्यायालय, अंबड, दिवाणी न्यायालय(व.स्तर) जालना व अंबड, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, जालना, दिवाणी न्यायालय(क.स्तर) अंबड, घनसावंगी, मंठा, परतूर, जाफाबाद, भोकरदन, बदनापूर या सर्व न्यायालयातील जुने नाशवंत व कालबाह्य झालेल्या अभिलेखाची नियमाप्रमाणे विक्री करावयाची आहे.

जिल्हा व सत्र न्यायालय , जालना व त्यांच्या अतंर्गत येणा–या न्यायालयातील उपलब्ध जुने नाशवंत कालबाह्य अभिलेख आपण आपल्या स्वखर्चाने खरेदी करुन घेऊन जाण्यास तयार असल्यास त्या बाबतची मोहोरबंद निवीदा मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना, जिल्हा व सत्र न्यायालय , जालना या पत्त्यावर दिनांक 15–04–2025 रोजीच्या कार्यालयीन वेळेच्या आत पोहोचतील या बेताने पाठवण्यिात याव्यात.

दिनांक 15–04–2025 रोजीच्या कार्यालयीन वेळे नंतर या न्यायालयास प्राप्त होणा–या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

उपरोक्त जाहीर प्रगटन आज दिनांक 09–04–2025 रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी देण्यात आले.

जा.क./अभिलेख/2046/2025
जिल्हा व सत्र न्यायालय, जालना
दिनांक 09–04–2025

आदेशान्वये,
09/4/25
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, जालना

# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, जालना</u>

जुने नाशवंत अभिलेख/रद्दी खरेदी दरपत्रका बाबत खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील .

1. प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक दाखल करण्याची परवानगी असेल.
2. या कार्यालयाच्या फायद्याच्या दृष्टीने सर्वात जास्त किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल.
3. रद्दी खरेदीदार निविदाकाराला अधिकृत खरेदीदार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी कमांक नमुद करणे बंधनकारक आहे.
4. निविदाकाराला दरपत्रकासोबत निविदाकाराचे पॅनकार्डची छायांकित प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.
5. निवीदा मध्ये सर्व प्रकारच्या खर्चाचा/चार्जेसचा उल्लेख करणे आवश्यक आहे.
6. निवीदा सादर करणा—या निविदाकाराचे या कार्यालयाबरोबर कोणताही प्रकारचे हितसंबंध नसावेत याची नोंद घ्यावी.
7. निवीदा सादर करतांना त्यामध्ये संदर्भाचा उल्लेख करणे बंधनकारक आहे व सदरील मोहोरबंद निवीदा या दिनांक 15—04—2023 रोजीच्या कार्यालयीन वेळे पर्यंत या कार्यालयात स्वीकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणा—या निवीदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
8. सदरील मोहोरबंद निविदा मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना यांचे नावे पाठविण्यात याव्यात. तसेच मोहोरबंद पाकिटावर रद्दी खरेदीसाठी निवीदा असा स्पष्ट उल्लेख करावा.
9. रद्दी खरेदीदार यांनी रद्दी खरेदी करतांना दर मान्य करुन त्यानुसार रद्दीची पुर्ण किंमत या कार्यालयात मोजमाप झाल्याबरोबर जमा करुन सदर विकी कागदपत्रांची गोपनीयता बाळगण्याच्या लेखी बंधपत्रासह या कार्यालयाने विकी केलेले कागदपत्रांचा/अभिलेखाचा दुरुपयोग केला जाणार नाही असा स्पष्ट उल्लेख रुपये 100 च्या बॉन्डवर करण्यात यावा.
10. मोहोरबंद निवीदा या जिल्हा न्यायालय, जालना त्रिसदस्यीय वस्तू विकी सल्लागार समिती यांचे समक्ष दिनांक 16.04.2025 रोजी सकाळी ठीक 10.30 वाजता, मा.जिल्हा न्यायाधीश—1, जालना यांचे निजी कक्षात उघडण्यात येतील. तसेच कांही तांत्रीक अडचणी निर्माण झाल्यास त्याच्या दुस—या दिवशी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी समिती समक्ष उघडण्यात येतील.
11. सदरील निवीदा स्विकारणे व नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना स्वतः राखून ठेवत आहे.

आदेशान्वये,

09/4/25

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय,

जालना.